# 'मेट्रो-३' यंत्रणेसाठी ६ कंपन्यांना स्वारस्य

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या 'मेट्रो-३' प्रकल्पाने चांगलाच वेग पकडला असून ट्रेनची बांधणी, रेल्वे रुळांची उभारणी तसेच प्रत्यक्ष रेल्वे चालवण्यासाठी आवश्यक यंत्रणा उभारण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल टाकण्यात आले आहे. यंत्रणा उभारण्याकरिता एका भारतीय कंपनीसह पाच आंतरराष्ट्रीय कंपन्यांनी स्वारस्य दाखवले असून, आता अंतिम निविदेनंतर नेमक्या कोणत्या कंपनीची निवड होणार हे स्पष्ट होईल.



फोटो प्रातिनिधीक

'मेट्रो-३' मार्गासाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन आठ डब्यांच्या ३१ लोकल खरेदी करणार आहे. या लोकलची बांधणी, रेल्वे रुळ टाकणे आदी कामे या कंपन्यांना करायची आहेत. या कामासाठी कोणत्या कंपन्या पात्र ठरू शकतील, यासाठी पात्रतापूर्व निविदा काढण्यात आली होती. त्यात पाच कंपन्यांची निवड झाली. फ्रान्स, स्पेन, चीनच्या कंपन्यांसह हिताची व मित्सुबिशी कॉर्पोरेशन या जपानच्या दोन कंपन्या आणि जपानच्या कावासाकी हेवी इंडस्ट्रीज या कंपनीसोबत भागीदारी असणारी 'भेल' या भारतीय कंपनीचा त्यांच्यात समावेश आहे.